आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

९ जुलै २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना नामिबियाचा  सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान, दोन्ही देशांमध्ये सामंजस्य करार

- गुजरातमधे बडोदा जिल्ह्यात पूल कोसळून झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू, केंद्र आणि राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर

- वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर तुकडेबंदी कायदा शिथिल करण्याची महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विधानसभेत घोषणा

- छत्तीसगडमध्ये १२ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

**आणि**

- राजस्थानमध्ये हवाई दलाचं विमान कोसळून २ वैमानिकांचा मृत्यू

**<><><><><>**

नामिबिया आणि भारत या दोन्ही राष्ट्रामधले संबंध अधिक दृढ केल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना नामिबियाचा सर्वोच्च राष्ट्रीय सन्मान देऊन आज गौरवण्यात आलं. प्रधानमंत्रांनी याबद्दल नामिबिया सरकारचे आणि तिथल्या नागरिकांचे आभार मानले आहेत.

**होल्ड - प्रधानमंत्री बाइट**

या पुरस्कारामुळे प्रधानमंत्री मोदी यांना मिळालेल्या पुरस्कारांची संख्या २७ वर गेली असून चालू दौऱ्यातला  हा चौथा पुरस्कार आहे.

प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत आज, नामिबिया इथे उद्योजकता विकास केंद्र स्थापन करण्यासंदर्भातला  सामंजस्य करार करण्यात आला. आरोग्य आणि औषध क्षेत्रातल्या सहकार्याच्या सामंजस्य करारावर देखील दोन्ही देशांनी स्वाक्षऱ्या केल्या.

यावेळी CDRI आणि जागतिक जैवइंधन आघाडीमध्ये नामिबिया च्या सहभागाबद्दलचं स्वीकृती पत्र देखील सादर करण्यात आलं . प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि नामिबियाचे राष्ट्राध्यक्ष नेटुम्बो नंदी-नदैतवाह यांच्यात राजधानी विंडहोक इथे शिष्टमंडळ स्तरावर चर्चा झाल्यानंतर हा सामंजस्य करार करण्यात आला.

**<><><><><>**

गुजरातमध्ये बडोदा जिल्ह्यात पदर इथं आज पहाटे पुलाचा काही भाग महिसागर नदीत कोसळून झालेल्या दुर्घटनेत ९ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. आणंद आणि बडोदा जिल्ह्यांना जोडणारा हा पूल होता.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. प्रधानमंत्र्यांनी या दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे. गुजरात राज्य सरकारने मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी चार लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

राज्यातील वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर तुकडेबंदी कायदा शिथिल करण्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत केली. याबाबतच्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना त्यांनी सांगितलं, की सध्या ५० लाखाहून अधिक कुटुंबांना तुकडेबंदी कायद्यामुळे अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याचा विचार करून, जानेवारी २०२५ पर्यंत नागरी क्षेत्रांमध्ये झालेल्या तुकड्यांना कायदेशीर दर्जा देण्यासाठी तुकडेबंदी कायदा शिथिल केला जाणार आहे. तर भविष्यात हा कायदा कायमचा रद्द करण्यासाठी एसओपी, अर्थात प्रमाण कार्यपद्धती ठरवली जाईल.

सध्या ५० लाखाहून अधिक कुटुंबांना तुकडेबंदी कायद्यामुळे अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या निर्णयामुळे नागरिकांना रजिस्ट्री, बांधकाम परवाने तसंच मालकी हक्क मिळवणे शक्य होईल.

महसूलमंत्र्यांच्या या निर्णयाचं सभागृहातल्या वेगवेगळ्या पक्षांच्या नेत्यांनी कौतुक केलं.

राज्यात आदिवासींच्या जमिनींचं हस्तांतरण बिगर आदिवासींकडे झाल्याच्या प्रकरणांची सखोल चौकशी करून पुढच्या तीन महिन्यांत अहवाल सादर केला जाईल, असं आश्वासनही बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिले. राज्याच्या विविध विभागांमधल्या १ हजार ६२८ प्रकरणांची माहिती आमदारांनी दिली आहे. त्यात कोकणातल्या ७३२ प्रकरणांचा समावेश आहे. या सर्व प्रकरणांची विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी केली जाईल, आणि त्याचा अहवाल सभागृहात मांडला जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक विचारार्थ नेमण्यात आलेल्या संयुक्त चिकित्सा समितीचा अहवाल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत सादर केला. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सुचवलेल्या सूचना समितीनं स्वीकारल्याचं स्पष्ट करून त्याचे तपशीलही बावनकुळे यांनी दिले. या समितीच्या एकंदर पाच बैठका झाल्या, यावर नागरिकांकडून १२ हजाराच्या वर सूचना आणि सुधारणा आल्या. युवा पिढीला नक्षलवादी विचारांकडे ढकलणाऱ्या संस्था, संघटनांवर चाप बसवण्यासाठी हे विधेयक आणलं असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

**<><><><><>**

आमदार निवासात निकृष्ट दर्जाचे जेवण दिल्या प्रकरणी, तिथल्या कर्मचाऱ्याला, एका आमदाराने मारहाण केल्याचं प्रकरण गंभीर असून या प्रकरणी, विधान परिषदेचे

सभापती आणि विधान सभेचे अध्यक्ष यांनी संपूर्ण माहिती घेऊन पुढील कारवाई करावी, अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत केली. आकाशवाणी आमदार निवासाच्या उपाहार गृहामधून अन्नाचे नमुने घेतले आहेत. पनीर, शेजवान चटणी, तेल आणि तूर डाळीचे नमुने घेण्यात आले असून ते प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. त्याचा अहवाल १४ दिवसांत येईल, असं अन्न आणि औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

**<><><><><>**

राज्यात ग्राहकांना स्मार्ट मीटर लावण्याची कोणतीही सक्ती करण्यात आलेली नाही, हे स्पष्ट करत, उलट स्मार्ट मीटर लावल्यामुळे, ग्राहकांच्या वीज बिलात कपात झाली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधान परिषदेत दिली. आमदार मिलिंद नार्वेकर यांनी ग्राहकांना, ठराविक कंपनीकडून स्मार्ट मीटर लावून घेण्याची, जबरदस्ती केली जात असल्याचा मुद्दा लक्षवेधी द्वारे उपस्थित केला होता.

**<><><><><>**

छत्तीसगडमधे दंतेवाडा जिल्ह्यात आज १२ नक्षलवाद्यांनी पोलीसांपुढे आत्मसर्मपण केलं. यातल्या ९ माओवाद्यांवर एकूण २८ लाख रुपयांचं बक्षीस होतं. छत्तीसगड सरकारच्या नव्या पुनर्वसन धोरणानुसार, या शरण आलेल्या माओवाद्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची प्रोत्साहनपर मदत, तसंच इतर सुविधा दिल्या जातील.

**<><><><><>**

भारतीय हवाई दलाचं जग्वार ट्रेनर हे लढाऊ विमान राजस्थानच्या चुरू जिल्ह्याजवळ आज कोसळलं. या दुर्दैवी अपघातात दोन्ही वैमानिकांचा मृत्यू झाल्याची माहिती हवाई दलानं दिली. हे विमान नियमित प्रशिक्षण उड्डाणावेळी अपघातग्रस्त झालं. अपघातात शहीद झालेल्या वैमानिकांच्या कुटुंबियांच्या दुःखात

सहभागी असल्याचं हवाई दलानं सांगितलं. दरम्यान, या अपघाताच्या सखोल चौकशीचे आदेश आदेश हवाई दलानं दिले आहेत.

<><><><><>

शिर्डीत गुरुपौर्णिमा उत्सवाला आज सुरुवात झाली. पहाटे काकड आरतीनंतर साईबाबांची प्रतिमा, पोथी आणि वीणा यांची मिरवणूक काढण्यात आली. व्दारकामाई मंदिरात श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाचं पारायण करण्यात आलं. साईबाबा समाधी मंदिर परिसरात विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट करण्यात आली आहे.

<><><><><>

नेपाळमधे काल पहाटेपासून सुरु झालेल्या जोरदार पावसामुळे ल्हेंडे आणि भोतकोसी या नद्यांना आलेल्या पुरात ९ जणांचा मृत्यू झाला असून, १९ जण बेपत्ता आहेत. नेपाळला चीनशी जोडणारा मितेरेपूल हा पूल या पुरात वाहून गेला आहे. पुरामुळे रासूवाघाडी जलविद्युत प्रकल्पाला हानी पोचली आहे त्यामुळे नॅशनल पॉवर ब्रीडचा किमान २११ मेगावॅट वीजपुरवठा बाधित झाला आहे. रसुवा सीमाशुल्क कार्यालयाच्या आवारात उभे असलेले सहा मालवाहू ट्रक, २३ कार्बो कंटेनर आणि ३५ इलेक्ट्रीक वाहनं या पुरात वाहून गेली. ढुंचे ते तिमुरे मार्ग या पुरामुळे बंद झाला आहे.

<><><><><>

मुंबई क्रिकेट असोसिएशनतर्फे यंदांच्या हंगामातल्या प्रशिक्षणाला आजपासून सुरुवात झाली. मुंबईत शरद पवार इनडोअर स्टेडियममध्ये झालेल्या या कार्यक्रमात ज्येष्ठ क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केलं.

//<><><><><>//